f/sujay/circular

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता / आयसीसी / (२०२३–२४) /54/ २०२४

## परिपत्रक:

विषय:— विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या महाविद्यालयांनी महाविद्यालय विकास समिती (CDC) ची स्थापना व अहवाल सादर न केल्यामुळे नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत....

संदर्भ:— विद्यापीठाचे परिपत्रक क्र. १) Aff./ICC/(2018-19)/04/ of 2018 दिनांक ०४ मे, २०१८,

२) स्मरणपत्र १—Aff./ICC/(2018-19)/47/ of 2019 दिनांक १६ मार्च, २०१९,

३) स्मरणपत्र २—Aff./ICC/(2019-20)/23/ of 2019 दिनांक ३० ऑक्टोबर, २०१९,

४) स्मरणपत्र ३—Aff./ICC/(2019-20)/34/ of 2020 दिनांक २८ फेब्रुवारी, २०२०,

५) स्मरणपत्र ४—Aff./ICC/(2020-21)/09/ of 2021 दिनांक ०६ मार्च, २०२१ आणि

६) स्मरणपत्र ५—Aff./ICC/(2021-22)/16/of 2021. दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ आणि

७) सुचना क्र संलग्नता / आयसीडी / २०२१–२२ / २०८२, दिनांक ०३ मार्च २०२२.

महोदया / महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७ नुसार महाविद्यालयाने महाविद्यालय विकास समिती (CDC) गठीत करणे व त्यासंबंधीत समितीचा वार्षिक अहवाल प्रत्येक वर्षी विद्यापीठाला ३० जून पूर्वी सादर करणे बंधनकारक आहे.

परंतु असे निर्दशनास येत आहे की, विद्यापीठाने उपरोक्त संदर्भानुसार वेळोवेळी परिपत्रक निर्गमित करून यासंदर्भात महाविद्यालयांना सूचित केले होते, तरीही बहुतांश महाविद्यालयांना महाविद्यालय विकास समिती गठित केलेली दिसून येत नाही तरी सदर प्रकरणाची गंभार दखल कुलपती तसेच विद्यापीठ कार्यालयातून घेण्यात येत आहे.

f/sujay/circular



आपणांस विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ९७ नुसार ज्या महाविद्यालयांनी 'महाविद्यालय विकास समिती' गठित केली नसेल अशा महाविद्यालयांनी तात्काळ समिती गठित करावी व त्या संबंधिचा अहवाल विद्यापीठास सादर करावा,

तसेच ज्या महाविद्यालयांनी 'महाविद्यालय विकास समिती' गठित केली असेल त्यांनी सदर समितीचा अहवाल महाविद्यालय संलग्नता व विकास विभागामध्ये सात दिवसाच्या आत सादर करण्यात यावा आणि

**जे महाविद्यालय 'महाविद्यालय विकास समिती' गठित करणार नाही अशा महाविद्यालयावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेशित करण्यास बंदी करण्याची कारवाई करण्यात येईल, यांची नोंद घ्यावी ज्या महाविद्यालयांनी संबंधित कागदपत्रे सादर केली असतील अशा महाविद्यालयांनी या सुचनेकडे दुर्लक्षित करण्यात यावे.**

सदर बाबीचे महत्व व गांभीर्य लक्ष्यात घेऊन 'महाविद्यालय विकास समिती' गठित केलेल्या कागदपत्रांची तसेच समितीच्या इतिवृत्ताच्या किंवा अहवालांच्या प्रती व वार्षिक अहवालाची पुर्तता तात्काळ करण्यात यावी.

Baliram

मुंबई–४०० ०३२
15 मार्च, २०२४

(प्रा. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रत:–

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.

# University of Mumbai

**Academic Authority**
**Meeting & Services**
No.AAMS/ICD/2023-24
12th March, 2024

To,
The Deputy Registrar
College Affiliations and Development Department (CAD)
University of Mumbai
**Fort – 400 032**

Sub: Resolution passed by the Board of Dean at its meeting held on 7th March, 2024 and Action Taken Report there on.

Sir,

With reference to the subject noted above, I have enclosed herewith the items which were placed before the Board of Deans at its meeting held on 7th March, 2024 (item no. 2.3 & 2.14) for its consideration along with the copy of the resolution passed by the Board of Deans thereon.

I am to request you to kindly take necessary action at your end on the aforesaid resolution/s and to send compliance report of the action taken by you thereon to the Assistant Registrar, Academic Authority, Meeting & Services, Fort, Mumbai within 8 days as to enable to include the same in the "Action Taken Report" to be placed before the next Board of Deans Meeting.

Please treat this as the Urgent.

Yours faithfully,
S.Sawant
(Sanjana Sawant)
offg.Deputy Registrar
(AAMS Section)

# मुंबई विद्यापीठ

**सुधारीत प्रत**

**महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग**

क्र.संलग्नता/आय.सी.डी./२०२३-२४/
मार्च, २०२४

प्रति,
सहायक कुलसचिव,
कार्यकारी प्राधिकरणे विभाग,
फोर्ट, मुंबई-४०० ०३२.

**अधिसभा सदस्यांचे नाव : . डॉ. विजय पवार (सिनेट मेंबर)**

संदर्भ:- १) डॉ. विजय पवार यांचे पत्र दिनांक ११ मार्च, २०२४

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर खालील प्रमाणे आहे:-

| प्रश्न क्र. | सदस्यांनी विचारलेले प्रश्न | प्रश्नावरील उत्तर व त्याबाबतची कागदपत्र (असल्यास) जोडावी |
|---|---|---|
| 1 (a) | As per the Maharashtra Public University Act 2016 section 97. (1) There shall be a separate College Development Committee for every affiliated, autonomous, empowered autonomous college or recognized institution. How many colleges formed CDC & conducts meetings regularly and sends the minutes of meeting to the university? Please provide the data. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ९७ नुसार एकूण ४१३ महाविद्यालयांनी महाविद्यालय विकास समितीची (CDC) स्थापना केली आहे. त्यापैकी ३९३ महाविद्यालयांनी अहवाल विद्यापीठाला सादर केला आहे. |
| 1 (b) | What action is taken by the University on the colleges who don't provide this data? Is there any mechanism in University for non-compliance of such acts. | दिनांक ०७. मार्च, २०२४ रोजी संपन्न झालेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीमधील बाब क्र. २.१४ अन्वये पारित झालेल्या ठरावानुसार ज्या महाविद्यालयांनी 'महाविद्यालय विकास समिती' गठीत केली नाही अशा महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून प्रथम वर्षाचे विद्यार्थी प्रवेशित करण्यास बंदी करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात आली आहे. |

उपकुलसचिव
महाविद्यालय संलग्नता व विकास विभाग

सहपत्र : जोडले आहे.